दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 01 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 139 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# MPSC विद्यार्थ्यांचे 2 ऑक्टोबरचे आंदोलन स्थगित

■ मुंबई : वृत्तसंस्था

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभाराबाबत विविध मागण्यांसाठी २ ऑक्टोबर रोजी पुण्यात आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेल्या विद्यार्थ्यांनी हे आंदोलन स्थगित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याबाबत प्रक्रिया सुरू करण्याबरोबरच सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली, प्रमुख अधिकाऱ्यांची चौकशी आणि यावर्षी रिक्त पदे भरण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला.

एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत होती. अध्यक्षांना पदावरून हटविण्याची प्रक्रिया सुरू होत असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. तसेच अध्यक्षांचा राजीनामा होण्यापूर्वी संबंधित प्रकरणाची तीन महिन्यांत न्यायालयीन चौकशी केली जाणार असल्याचे आश्वासन मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. काही प्रमुख अधिकाऱ्यांचीही चौकशी करण्यात येणार आहे.

एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्या बदलीचे आश्वासनही विद्यार्थ्यांना देण्यात आले आहे. आयोगाच्या कामकाजाशी संबंधित अधिकाऱ्यांबाबतही आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन बैठकीत देण्यात आल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. परीक्षा पद्धतीबाबतही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. एमपीएससीच्या आगामी सर्व परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. परीक्षेसंदर्भात 'सिंगल कार्ड' यंत्रणा उभारण्याचेही आश्वासन देण्यात आले आहे. कृषी सेवेच्या पेपरच्या तपासणीबाबतही विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित केले होते. या पेपरची तपासणी केली जाणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. तसेच यावर्षी विविध विभागांतील रिक्त पदे भरण्यात येतील, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.



# बाळासाहेब आजबे तुम्हीच जिभेला आवर घालावा

## भाऊसाहेब आजबे यांचे वारस असाल तर आरोप सिद्ध करा ; प्राजक्ताताई धस यांचे बाळासाहेब आजबे यांना प्रत्युत्तर..

■ आष्टी ( प्रतिनिधी )

माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी दुष्काळी मोर्चा काढला खरा परंतु त्यामध्ये दुष्काळी मागण्या सोडून माझे चारित्र्य हनन करण्याचा केविलवाणा प्रयत्न बाळासाहेब आजबे यांनी करून त्यांच्याकडेच अकलेचा दुष्काळ असल्याचे प्रदर्शन केले आहे ..

मॅडमला आवरा असे म्हणणाऱ्या बाळासाहेब आजबे यांनीच जिभेला आवर घालावा आणि खरेच भाऊसाहेब आजबे यांचे वारस असतील तर त्यांनी माझ्यावरील आरोप सिद्ध करावेत आपण त्यांच्याविरुद्ध अब्रु नुकसानीचा दावा दाखल करणार आहोत असे प्रत्युत्तर महानंद,मुंबई संचालिका प्राजक्ताताई धस यांनी दिले आहे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी दुष्काळी मोर्चामध्ये केलेल्या आरोपा विषयी प्रत्युत्तर देताना त्या बोलत होत्या

त्यापुढे म्हणाल्या दुष्काळी मोर्चामध्ये पाण्याविषयी, दूध उत्पादक शेतकऱ्यांविषयी मागणी करण्याऐवजी बाळासाहेब आजबे यांनी मॅडमला आवरा असे म्हणत पिंपळा, पुंडी, पांढरी, सोलेवाडी, तवलवाडी, इमनगाव, हनुमंतगाव, शिदेवाडी, शिराळ, चिंचपूर आणि आष्टी परिसरातील जमिनी घेतल्या आहेत असा आरोप केला आहे याबाबत बाळासाहेबांनी हे सिद्ध करूनच दाखवावे असे आपले त्यांना जाहीर आव्हान आहे "बायकात बहू बालिश बडबडला" अशी त्यांची अवस्था झाली असून बाळासाहेब आजबे हे सतत आपले चारित्र्य हनन करत असल्यामुळे त्यांचे विरुद्ध अब्रूनुकसानीचा दावा दाखल करणार आहे असे सांगत त्यापुढे म्हणाल्या की , बाळासाहेब आजबे हे दादेगाव देवस्थानची शेकडो येथील जमीन फुकट खात आहेत त्यांना प्रभू रामचंद्रानेच असे बिन बुडाचे आरोप करण्याची दुर्बुद्धी दिली असावी. पाच टर्म आमदार असलेले माझे पती यांचा मला नैतिक धाक आहे.. त्यामुळे मला आवरा म्हणण्याची गरज नाही



तुमचीच नैतिकता काय आहे ? याचे पुरावे माझ्याकडे आहेत योग्य वेळी ते जनतेसमोर घेऊन येईल असा इशारा त्यांनी यावेळी दिला भीमराव धोंडे यांचा कार्यकर्ता असलेला हेमंत मेहेर याचे विरुद्ध महिलेला उभी करून खोटी केस करण्यात आली हे चुकीचे असल्यामुळे जमिनीचा वाद आहे.जमीन मोजून घ्यावी आणि वाद मिटवावा जमीन विकू नये असे माझ्याकडे आलेल्या दोन्ही बाजूंना मी समजून सांगितले याचे बाळासाहेब आजबे यांना वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही

पुंडी येथील जमीन सन 2012 मध्ये सुमारे 14 वर्षांपूर्वी खरेदी करण्यात आली आहेआणि सर्व जमिनींचा उल्लेख निवडणूक शपथपत्रांमध्ये करण्यात आलेला आहे. मी दुग्ध व्यवसाय तसेच इतर नोंदणीकृत कंपन्यांद्वारे व्यवसायात असून इन्कमटॅक्स रिटर्न भरत आहे. बाळासाहेब आजबे यांच्या पाच वर्षे कार्य काळामध्ये एक लाख मतांनी जनाधार कमी झाला आहे या नैराशेतूनच त्यांनी माझ्यावर आरोप केले आहेत मात्र अशा आरोपांचा आता अतिरेक झाला असल्यामुळे मी त्यांचे विरुद्ध अब्रुनुकसानीचा खटला दाखल करणार आहे.

# माजी आ . आजबेंचे चुलत मेव्हणे माजी सरपंच निळकंठ सुंबरे यांच्यासह गोवर्धन सुंबरे यांचा आ . सुरेश धस यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये जाहीर प्रवेश

■ आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी विधानसभा मतदारसंघातील राजकीय घडामोडींना वेग आला असून, लोणी जिल्हा परिषद गटातील सराटेवडगावचे माजी सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) चे पदाधिकारी निळकंठ सुंबरे तसेच त्यांचे बंधू गोवर्धन सुंबरे यांनी आमदार सुरेश धस यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. निळकंठ सुंबरे हे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांचे चुलत मेहुणे असल्याने त्यांच्या भाजप प्रवेशाला स्थानिक राजकारणाच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले आहे.

निळकंठ सुंबरे यांनी सराटेवडगावच्या सरपंचपदाची जबाबदारी सांभाळली असून, स्थानिक पातळीवर त्यांचा जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क लक्षात घेता त्यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा सुरू झाली आहे. त्यांच्या सोबत बंधू गोवर्धन सुंबरे यांनीही भाजपमध्ये प्रवेश केल्याने लोणी जिल्हा परिषद गटातील राजकीय



समीकरणांवर त्याचा परिणाम होण्याची चर्चा होत आहे. भाजपच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त करत पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार सुंबरे बंधूंनी यावेळी व्यक्त केला.

'जिथे विश्वास, तिथे प्रवेश' या भूमिकेतून सुंबरे बंधूंनी आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली भाजपची वाट धरल्याचे यावेळी सांगण्यात आले. या प्रवेशामुळे लोणी जिल्हा परिषद गटात भाजपच्या संघटनात्मक कामाला बळ मिळणार असून ग्रामपातळीवर पक्षाची बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी नव्या कार्यकर्त्यांची फळी उभी राहण्यास मदत होणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य अशोक तरटे, उपसरपंच पवन तरटे, माजी उपसरपंच महादेव शिंदे, तानाजी सुंबरे, सुनील सुंबरे सर, घनश्याम शिंदे, सुनील शिंदे, विनोद तरटे, प्रसाद सुंबरे, संग्राम सुंबरे, हर्षद सुंबरे, झुंबर कळसाईत, संतोष कळसाईत, बाबू बेंद्रे, कृष्णा कळसाईत यांच्यासह अन्य कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.

# दारावती तांडा येथे प्रेमदास पवार यांच्या वाढदिवसानिमित्त 1 ऑक्टोबरला भव्य रक्तदान शिबिर , सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानाचा उपक्रमाचे आयोजन



■ परळी वैजनाथ : प्रतिनिधी

ऊसतोड कामगार महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष मा. श्री. प्रेमदास पवार (बापू) यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता समाजोपयोगी उपक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्याचा हा प्रयत्न असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत हे रक्तदान शिबिर कारभारी चौक, दारावती तांडा, परळी वै. येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांसाठी रक्तसाठा उपलब्ध होण्यास मदत व्हावी आणि रक्तदानाबाबत समाजामध्ये जनजागृती निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. 'रक्तदान श्रेष्ठ दान'चा संदेश... रक्ताची गरज ही कोणत्याही वेळी निर्माण होऊ शकते. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे तसेच विविध आजारांवरील उपचार घेत असलेल्या रुग्णांसाठी रक्ताची आवश्यकता भासते. अशा परिस्थितीत रक्तदात्यांनी केलेले रक्तदान अत्यंत मोलाचे ठरते. त्यामुळे "आपले एक रक्तदान, कोणाच्या तरी आयुष्यातील नवी आशा" या भावनेतून नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमातून सामाजिक एकोपा आणि परस्पर सहकार्याचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. रक्तदानासाठी युवक, सामाजिक कार्यकर्ते, कामगार बांधव तसेच परिसरातील नागरिकांनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन .. प्रेमदास पवार (बापू) यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात पात्र रक्तदात्यांनी वेळेत उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक कार्याला हातभार लावत एखाद्या गरजू व्यक्तीच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करण्याची संधी या माध्यमातून नागरिकांना मिळणार आहे. रक्तदान करा, सामाजिक बांधिलकी जपा आणि जीवन वाचविण्याच्या कार्यात आपला सहभाग नोंदवा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



# वेस्ट इंडिज विरुद्धच्या वनडे मालिकेत रोहित-विराट रचणार विक्रम

■ मुंबई वृत्तसंस्था

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तीन सामन्यांची वनडे मालिका होणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना पुन्हा एकदा मैदानात पाहण्याची संधी त्याचे चाहते आणि क्रीडाप्रेमी यांना मिळणार आहे. या मालिकेतील पहिला सामना 27 सप्टेंबर रोजी खेळवला जाणार असून, या सामन्यात भारतीय संघाचे दोन्ही दिग्गज फलंदाज प्लेइंग 11 चा भाग असणार आहेत. या पहिल्याच सामन्यात हे दोन्ही स्टार खेळाडू आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दोन ऐतिहासिक विक्रम रचण्याच्या वेशीवर उभे आहेत. दरम्यान, रोहित शर्मा या मालिकेत खेळेल की नाही याबाबत बरीच चर्चा रंगली होती. पण लॉर्ड्सवर रंगलेल्या इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या वनडे सामन्यात त्याने शतक ठोकलं आणि टीकाकारांची तोंडं बंद केली होती. आता तशाच कामगिरीची अपेक्षा वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत आहे.



## विराट कोहली 15 हजारांचा टप्पा गाठणार

■ विराट कोहली क्रिकेट जगतात नवा इतिहास रचण्यासाठी सज्ज झाला आहे. विराट कोहलीला एकदिवसीय क्रिकेटमध्ये 15,000 धावा पूर्ण करण्यासाठी अवघ्या 59 धावांची गरज आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या सामन्यात त्याने ही कामगिरी केल्यास, महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरनंतर वनडे क्रिकेटमध्ये 15 हजार धावा करणारा दुसरा फलंदाज ठरेल. विराट कोहलीने आपल्या 314 वनडे सामन्यांच्या कारकिर्दीत 15,903 चेंडूंचा सामना करत 14,941 धावा कुटल्या आहेत. यादरम्यान तो 47 वेळा नॉट आऊट राहिला असून 18 वेळा शून्यावर बाद झाला आहे. त्याने आपल्या फलंदाजीच्या जोरावर 54 शतके आणि 79 अर्धशतके ठोकली असून यामध्ये 1,389 चौकार आणि 172 षटकारांचा समावेश आहे.

## रोहित शर्मांला '12 हजारी' क्लबचे वेध

■ रोहित शर्मादेखील एका मोठ्या विक्रमाच्या जवळ पोहोचला आहे. रोहित शर्माला एकदिवसीय क्रिकेटमध्ये 12,000 धावांचा टप्पा पूर्ण करण्यासाठी आता केवळ 105 धावांची आवश्यकता आहे. रोहित शर्माने आतापर्यंत खेळलेल्या 288 वनडे सामन्यांमध्ये 12,784 चेंडूंचा सामना करत 11,895 धावा केल्या आहेत. रोहित शर्मा आपल्या कारकिर्दीत 37 वेळा नॉट आऊट राहिलेला रोहित 16 वेळा शून्यावर बाद झाला आहे. त्याने वनडे क्रिकेटमध्ये 34 शतके, 62 अर्धशतके आणि तब्बल 3 द्विशतके ठोकण्याचा अनोखा विश्वविक्रम केला असून त्याच्या नावावर 1,125 चौकार आणि 369 षटकार नोंदवले गेले आहेत. 27 सप्टेंबर रोजी होणाऱ्या या पहिल्या सामन्यात हे दोन्ही फलंदाज नवा इतिहास रचणार का, याकडे चाहत्यांचे डोळे लागले आहेत.

# लोक तुझा तिरस्कार करतील : वीरेंद्र सेहवाग

■ मुंबई वृत्तसंस्था

वीरेंद्र सेहवागचा मुलगा आर्यवीर सध्या क्रिकेट जगतात चर्चेचा विषय आहे. भारतासाठी अंडर 19 संघात त्याची निवड झाली असून वनडे मालिका खेळाल. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकूण 109 धावा केल्या. त्याच्या या कामगिरीमुळे त्याच्यात वीरेंद्र सेहवागच्या आक्रमक शैलीची झलक दिसत असल्याची प्रतिक्रिया क्रीडा जगतात उमटल्या आहे. अनेकांनी त्याच्या आक्रमक फलंदाजीचं कौतुक केलं आहे. असं असताना वडील या नात्याने वीरेंद्र सेहवागने मुलगा आर्यवीर याला सल्ला दिला आहे. सेहवागने सांगितलं की, या मालिकेपूर्वीच मी आर्यवीरल एक सल्ला दिला होता. त्याला सांगितलं होतं की बिनधास्तपणे खेळ.. मोठ्या धावसंख्येची चिंता अजिबात करू नको. इतकंच काय तर त्याला सांगितलं होत की, लोकं तुझ्यावर प्रेम करतील आणि तुझा तिरस्कारही करतील. लोकांच्या या गोष्टींवर कोणतीच प्रतिक्रिया द्यायची नाही.

## आर्यवीर सेहवागची कामगिरी

■ आर्यवीर सेहवागची अंडर 19 भारतीय संघात निवड झाली आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या मालिकेत खेळण्याची संधी मिळाली. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन सामन्यात 109 धावा केल्या. यावेळी त्याचा स्ट्राईक रेट 100 हून अधिक होता. पण दुर्दैवाने त्याला अर्धशतकी कामगिरी करता आली नाही. तिसऱ्या सामन्यात 47 धावांवर असताना बाद झाला.



### वीरेंद्र सेहवाग काय म्हणाला?

वीरेंद्र सेहवागने एका मुलाखतीत सांगितलं की, 'मला आर्यवीर सेहवागचा अभिमान वाटतो. मी त्याला स्पष्ट सांगितलं आहे की दबाव तर असतोच, पण मैदानावर निर्भयपणे खेळ. मोठी धावसंख्या उभारण्याची चिंता करू नको. जर तू निर्भयपणे खेळला तर मोठी धावसंख्या आपोआप होईल. जर तू मोठ्या धावसंख्येबाबत विचार करत राहिला तर मला नाही वाटत की मोठी धावसंख्या होईल.' वीरेंद्र सेहवाग पुढे म्हणाला की, 'मी आर्यवीर सांगितलं आहे की, लोकं तुझ्यावर प्रेम करतील, लोकं तुझ्यावर टीका करतील, तुझा तिरस्कार करतील, पण त्यावर कोणतीच प्रतिक्रिया द्यायची नाही. तू जे काही करत आहेस त्यावर खूश राहायचं.'

वीरेंद्र सेहवागने आर्यवीरला सांगितलं की, 'जर तू धावा केल्या तर तर समजून जायचं की तू चांगली कामगिरी केली आहे. जर तू चांगल्या धावा करू शकला नाहीस तर समजून जायचं की चांगली कामगिरी करत नाहीस. त्यामुळे लोकं काय म्हणतात याचा विचार करण्यापेक्षा आपल्या सरावावर लक्ष केंद्रीत करात. त्यांना जे काही म्हणायचं आहे ते म्हणू दे. तू तुझ्या खेळावर लक्ष केंद्रीत कर.'

# सीमा कुमारीची ऐतिहासिक कामगिरी! महिलांच्या 10,000 मीटर शर्यतीत पटकावले कांस्यपदक

■ नागोया (जपान) :

जपानमधील नागोया येथे सुरू असलेल्या 2026 च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी आपली चमकदार कामगिरी सुरूच ठेवली आहे. अटीतटीच्या आणि रोमहर्षक झालेल्या महिलांच्या 10,000 मीटर धावण्याच्या शर्यतीत भारताच्या सीमा कुमारी हिने उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत कांस्यपदक आपल्या नावावर केले. तिच्या या शानदार विजयामुळे भारताच्या ॲथलेटिक्स पदकांच्या खात्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

शर्यतीच्या सुरुवातीपासूनच आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ धावपटूंचे मोठे आव्हान होते. विनफ्रेड यावी आणि नोझोमी तनाका यांच्यात सुवर्ण आणि रौप्य पदकांसाठी अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. असे असतानाही, भारतीय धावपटू सीमा कुमारी शेवटच्या टप्प्यापर्यंत पदकाच्या शर्यतीत अत्यंत आत्मविश्वासाने टिकून राहिली. शर्यतीच्या अखेरच्या क्षणी तिने आपल्या मागे असलेल्या इतर स्पर्धकांना मागे टाकत आपले तिसरे स्थान अगदी पक्के केले आणि देशाची मान अभिमानाने



उंचावली.

या शर्यतीत विनफ्रेड यावी हिने 32:39.18 मिनिटांची उत्कृष्ट वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावले, तर जपानच्या नोझोमी तनाकाने 32:41.54 मिनिटांच्या वेळेसह दुसरे स्थान मिळवून रौप्यपदक आपल्या देशाच्या झोळीत टाकले. भारताच्या सीमा कुमारीने या कठीण अंतिम फेरीत 32:50.05 मिनिटांची उल्लेखनीय वेळ देत कांस्यपदकावर आपले नाव कोरले.

## अवघ्या काही अंतराने हुकले पदक

■ दुसरीकडे, याच स्पर्धेतील महिलांच्या तिहेरी उडी (Triple Jump) प्रकारात भारताच्या आशा इलांगोचे पदक अतिशय थोडक्यात हुकले. तिला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले, तर याच प्रकारात भारताच्या निहारिका वशिष्ठ हिने 10 व्या स्थानावर आपली स्पर्धा पूर्ण केली. आशा इलांगोने या प्रकारात 13.83 मीटरची सर्वोत्तम उडी मारत थेट चीनची कांस्यपदक विजेती खेळाडू ली यी हिच्या कामगिरीशी बरोबरी साधली होती. मात्र, नियमांनुसार होणाऱ्या 'काऊंटबॅक'च्या निकषात तिचा पदकाचा मार्ग रोखला गेला. आशाची दुसऱ्या क्रमांकाची सर्वोत्तम कामगिरी 13.65 मीटर होती, जी ली यीच्या 13.79 मीटरच्या कामगिरीपेक्षा किंचित कमी पडली. तिचा सहावा आणि अंतिम प्रयत्न 13.59 मीटरचा राहिला.



# वैभव सूर्यवंशीने उडवली होती गौतम गंभीरची झोप, रात्रभर विचारात गुंतला!

■ मुंबई प्रतिनिधी

एशियन गेम्स स्पर्धेसाठी भारतीय संघ श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात जापानमध्ये आहे. वैभव सूर्यवंशीही एशियन गेम्स स्पर्धा खेळण्यासाठी जापानमध्ये संघासोबत आहे. मात्र त्याला प्लेइंग 11 मध्ये संधी मिळेल की नाही हे सांगणं कठीण आहे. दुसरीकडे, प्रशिक्षक गौतम गंभीर वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारतात आहे. असं असताना वैभव सूर्यवंशीमुळे टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरची रात्रीची झोप उडाली होती. त्याचं कारणही तसंच होतं. याबाबतचा खुलासा खुद्द गौतम गंभीर याने केला आहे. त्याने इंग्लंड दौऱ्यात काय झालं होतं? याबाबत सांगताना हा खुलासा केला. इंग्लंड दौऱ्यात एक निर्णय घेताना त्याच्या मनाची घालमेल झाली होती. क्रिकेट कारकिर्दीतील सर्वात कठीण निर्णय असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. या निर्णयाच्या मुळाशी वैभव सूर्यवंशी होता. त्यामुळे त्याला रात्रभर झोप लागली नाही. वेस्ट इंडिजविरुद्ध वनडे मालिकेपूर्वी प्रशिक्षक गौतम गंभीर याने जियो हॉटस्टारशी संवाद साधला. गौतम गंभीरने सांगितलं की, इंग्लंड दौऱ्यात संजू सॅमसनला बसवून वैभव सूर्यवंशीला खेळवणं हा कोचिंग करिअरमधील सर्वात कठीण निर्णय होता. या निर्णयामुळे रात्रभर झोप लागली नाही. इंग्लंड दौऱ्यातील पाच सामन्यांच्या टी20 मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताचा पराभव झाला. त्यानंतर संजू सॅमसनला बसवून वैभव सूर्यवंशीला संधी दिली गेली. पण हा निर्णय का घेतला? याबाबत सांगताना गौतम गंभीर म्हणाला की, वैभव सूर्यवंशी फॉर्मात होता आणि भारताला ही मालिका जिंकायची होती. पण संजू सॅमसन टी20 वर्ल्डकप स्पर्धेत प्लेयर ऑफ द टूर्नामेंट होता, त्यामुळे हा निर्णय घेताना कठीण गेलं. पण या निर्णयाबाबत प्रामाणिकपणे संजू सॅमसनशी चर्चा केली होती, असंही गंभीर पुढे म्हणाला.

गौतम गंभीरने सांगितलं की, प्रशिक्षकाच्या दोन वर्षाच्या कारकिर्दीतील ती सर्वात कठीण रात्र होती. मी रात्रभर झोपू शकलो नाही. मी याबाबत संजू सॅमसनला सांगितलं होतं. संजूने हा निर्णय समजून घेतला आणि निवांतपणे मान्यही केलं. ही चर्चा फक्त संजू आणि माझ्यात झाली होती. या मालिकेनंतर संजू सॅमसन भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध टी20 मालिका खेळला. या मालिकेत वैभव सूर्यवंशी ऐवजी संजूला संधी दिली गेली. त्या संधीचं संजू सॅमसननं सोनं केलं आणि 2 अर्धशतकं ठोकली. इतकंच काय तर अफगाणिस्तानला क्लिन स्विप दिला.

# किंग कोहली अडचणीत? वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात होऊ शकतो हा मोठा अनर्थ!

■ मुंबई वृत्तसंस्था

वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेला 27 सप्टेंबरपासून सुरूवात होणार आहे. या मालिकेसाठी टीम इंडिया सज्ज असून जोरदार सराव सुरू आहे. या सामन्याता सर्वांच्या पुन्हा एकदा विराट कोहली आणि रोहित शर्माच्या कामगिरीकडे लागून आहे. कारण या मालिकेतील कामगिरीवरून पुन्हा एकदा आकलन केलं जाणार आहे. पुढच्या वर्षी होणाऱ्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेसाठी या दोन्ही खेळाडूंचा फॉर्म महत्त्वाचा आहे. दुसरीकडे, या मालिकेपूर्वी विराट कोहलीच्या चाहत्यांच्या कपाळावर आठ्या पडल्या आहेत. त्याला कारणही तसंच आहे. विराट कोहली वेस्ट इंडिजविरुद्धच्या मागच्या दोन वनडे मालिकांमध्ये फेल गेला होता. आता पुन्हा तसंच झालं तर सुमार कामगिरीची हॅट्ट्रीक होईल. मागच्या दोन वनडे मालिकेतील कामगिरी पाहिल्यानंतर तुमच्या लक्षात येईल.

### वेस्ट इंडिजविरुद्ध विराट कोहलीची बॅट शांत?

विराट कोहलीने वेस्ट इंडिजविरुद्ध 2022 मध्ये वनडे मालिका खेळली होती. तेव्हा तीन सामन्यातील तीन डावात फक्त 26 धावा करू शकला होता. तेव्हा विराट कोहलीची सरासरी फक्त 8.66 इतकी होती. तर 2019 मध्ये पार पडलेल्या वनडे मालिकेतील तीन सामन्यात त्याने फक्त 89 धावा केल्या होता. तेव्हा विराट कोहलीची सरासरी 29.6 होती. वेस्ट इंडिजविरुद्धच्या सहा सामन्यात विराट कोहलीची कामगिरी काही खास राहिली नाही. त्यामुळे विराट कोहलीच्या चाहत्यांसाठी वेस्ट इंडिज मालिका वाईट स्वप्नासारखं आहे. आता विराट कोहली सुमार कामगिरीची हॅट्ट्रीक करतो की त्यावर मात करतो हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.



### विराट कोहली जबरदस्त फॉर्मात

विराट कोहली यावर्षी शेवटची वनडे मालिका इंग्लंडविरुद्ध खेळला होता. तेव्हा त्याने जबरदस्त कामगिरी केली होती. विराट कोहलीने कार्डिफमध्ये 65 आणि लॉर्ड्सवर 74 धावांची खेळी केली होती. त्यामुळे विराट कोहली फॉर्मात हे स्पष्ट दिसत आहे. विराट कोहली फॉर्मात असला की काय होतं हे सांगायला नको. त्याने मागच्या सहा सामन्यात 64 च्या सरासरीने 384 धावा केल्या आहेत. यात त्याने एक शतक आणि तीन अर्धशतकं ठोकली आहेत. त्यामुळे विराट कोहली मागच्या दोन वनडे मालिकेत हिशेब चुकता करेल असंच दिसत आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# स्वयंपाकघरातील सौंदर्यवर्धना



हातांची नखे, ओठ यांना दुधाची साय लावावी. साय लावल्यामुळे नखे मऊ राहतात. ओठांना भेगा पडत नाही व ते देखील मऊ होतात.

दही हे सौंदर्य वाढीसाठी उपयुक्त आहे.त्वचेचे नैसर्गिक आवरण म्हणजेच आम्ल आच्छादन अबाधित ठेवण्यास दही काम करते. यात चंदन/लव्हेंडर/रोज असे सुगंध टाकून त्वचेला लावल्यास तेलकटपणा जाऊन त्वचा उजळते. दही केसांना पण उपयोगी आहे.

लोणी काढल्यावर एक टेबल स्पून लोण्याने चेहरा, हात , गळा डोळ्याच्या आजूबाजूने मसाज करावा. मसाजची दिशा खालच्या बाजूने वरच्या बाजूला व आतून बाहेर अशी असावी. त्यातही वाळा/गुलाब तेल टाकून सुगंधी करावे.

साजूक तुपाने तळपाय रात्री चोळावे. हिरड्यांना मसाज करावा. ओठांना लावावे. खूप फायदा होतो. तूप मात्र घरगुती, लोणकढे घ्यावे.

सौंदर्याची काळजी घेणे हे प्रत्येक स्त्रीला मनापासून वाटत असते. प्रथम मुलांची काळजी व नंतर घरातील इतर जणांची काळजी घेताना गृहिणी स्वतःलाच विसरतात. चाळीशी आली की त्वचा, डोळे, केस यांच्या विविध तक्रारी सुरु होतात. ब्युटीपार्लर मध्ये वारंवार जाण्यासाठी वेळ व पैसा दोन्हींची कमतरता जाणवते. पण प्रत्येक गृहिणींच्या हे लक्षात येत नाही की, स्वयंपाकघरातील अनेक पदार्थांचा सौंदर्यवर्धनासाठी खूप उपयोग होतो.स्वयंपाकघरातील पदार्थापासून स्वाद, गंध व शरीर-मनाची तृप्ती करणारे अन्नपदार्थ बनवले जातात. पण आपल्या रूपासाठी वेगळा एकही पैसा खर्च ण करता उपचार होतात. दुध, दही, तूप, मध, विविध भाज्या डाळी इ. पासून स्त्रियांना आपले सौंदर्य जोपासता येते.



## काय करता येईल

सकाळी दुध तापविण्यापूर्वी तीन ते चार टेबल स्पून दुध वातीत काढावे. ह्या दुधाने चेहरा, मान, गळा सर्व ठिकाणी चोळावे. घरगुती क्लिन्झिंग होऊन त्वचा साफ होते. या दुधात हळदीची चिमुट, ज्येष्ठमध, अनंतमूळ , चंदन, गुलाब, खस, मंजिष्ठ, नीम, संत्रासाल, तुळशी, पुदिना यापैकी एक पावडर अर्धा टेबल स्पून टाकून चेहऱ्याला लावावे. हे जमले नाही तर हळकुंड, चंदन इ. सहाणीवर उगाळावे. वाटल्यास त्यात बदाम उगाळावे, किंचित केशर टाकून दुधात मिसळून चेहऱ्यावर, मानेवर हातांना व गळ्याला चोळून लावावे. सुकले की चेहरा चोळून्न धुवावा.

# घरीच नैसर्गिक 'ब्लीच'

त्वचेच्या मृत पेशी घालविण्यासाठी अनेक महिला ब्लीच करतात. यामुळे चेहऱ्याचा रंग उजाळतो. परंतु नेमक्या कोणत्या कंपनीचे ब्लीच वापरावे हे बहुतेक जणांना समजत नाही. यामुळे चुकीच्या सौंदर्यप्रसाधनामुळे विपरित परिणाम होतात. यासाठी घरीच करा नैसर्गिक ब्लीच...



**टोमॅटो** - टोमॅटो एक सौंदर्यवर्धक फळ आहे. पिकलेल्या टोमॅटोचा रस घेऊन पूर्ण चेहऱ्यावर मसाज करा. यानंतर पाण्याने चेहरा धुवा. असे काही दिवस नियमित केल्यास तुम्हाला नक्कीच फरक जाणवेल.

**दही**- दह्यामध्ये अनेक प्रकारचे घटक असतात. यातील लॅक्टीक ॲसिड त्वचा उजळण्याचे काम करते. चेहऱ्यावर दही लावून काही वेळासाठी तसेच ठेवा. त्यानंतर चेहरा पाण्याने धुवून घ्या. हा प्रयोग सलग दोन आठवडे करा. तुम्हाला नक्कीच ब्लीचचा परिणाम दिसेल.

**लिंबू** - लिंबू एक नॅचरल ब्लीच आहे. झोपण्याच्या अगोदर चेहऱ्यावर लिंबाचा रस लावून झोपा. हे काही दिवसांच्या अंतराने करत राहा. चेहरा उजळ होण्यास मदत होईल.

**बटाट्याचा रस** - बटाट्याचा रस चेहऱ्यावर काही वेळासाठी लावून ठेवा. त्यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवा. हे आठवड्यातून एक वेळी केल्यास काही महिन्यात तुम्हाला फरक दिसेल.

# सावळी त्वचा, नो वे



आपल्या त्वचेवरील सावळी छाया आपल्या सौंदर्याला ग्रहण लावत असते. आपल्या नाजूक व सुंदर चेहऱ्यावरील सावळी छाया दुर करण्यासाठी काही टिप्स...

- लिंबू त्वचेसाठी फारच गुणकारी आहे. याचा प्रयोग वेगवेगळ्या फेसपॅकमध्ये करू शकता.
- दुधाच्या सायीत लिंबाचा रस टाकून तयार झालेली पेस्ट चेहऱ्यावर लावावी. त्यानंतर 10 मिनिटांनी चेहरा गरम पाण्याने धुऊन घ्यावा.
- गुडघे व हाताचे कोपरे जर काळपट पडले असतील तर त्यावर लींबाच्या साली घासाव्यात.
- बिटच्या रसात टोमॅटोचा रस व चिमूटभर हळद मिसळून चेहऱ्यावर लावल्याने काळे डाग नाहीसे होतात.
- द्राक्षाच्या रसात मध टाकून चेहऱ्यावर लावावे.

# झटपट मेकअप करा

ऑफिसमध्ये आपण बराच वेळ राहतो. मात्र मेकअप काही टिकून राहत नाही. त्यातच एखाद्या मीटिंग किंवा पार्टीमध्ये जावे लागले तर झटपट मेकअप कसा करायचा हेदेखील लवकर सुचत नाही. त्यामुळे परफेक्ट मेकअप करायाच्या टिप्स घेतल्या तर तुम्ही ऑफिसमध्येदेखील स्मार्ट आणि सुंदर दिसू शकता.





## सकाळचा मेकअप

सकाळी कार्यक्रम असेल तर नैसर्गिक आणि हलका मेकअप करा. त्यावेळेस शायनी किंवा शिमरचा उपयोग कमी करावा. आयशॅडोही हलक्या रंगाचा वापरावा. ब्लशर जास्त गडद करू नये. लिपस्टिकही मॅटफिनिशची वापरावी.

## संध्याकाळचा मेकअप

हायलायटिंग एरियावर शिमर करावं. इव्हिनिंग मेकअपमध्ये शिमरचा उपयोग केला तरी चालतो. आयशॅडो गडद आणि ग्लिटरबेस्ड करू शकतो. ब्लशर डार्क आणि फेसकट बघून करावं. लिपस्टिकवर लिपग्लॉसही उठून दिसतो.

## मेकअपचे तंत्र

मेकअपसाठी अंडाकृती चेहरा चांगला मानला जातो. जर चेहरा चौकोनी, त्रिकोणी, गोल, हार्ट किंवा डायमंड शेपचा असेल, तर मेकअपमधील काही विशिष्ट प्रॉडक्ट्सच्या साहाय्याने फेस कटिंग करून घ्यावा लागतो.

- चेहरा धुतल्यावर चांगल्याप्रकारे मॉइश्चराइज करा नंतर फाउंडेशन लावा. फाउंडेशन नेहमी ब्रशने लावले पाहिजे, बोटाने ते पूर्ण चेहऱ्यावर सारखे लागत नाही. फाउंडेशन नेहमी गळ्यापर्यंत लावले पाहिजे. नंतर पावडरने मेकअपला फायनल टच द्यायला हवा.
- ऑफिसमध्ये अचानक एखाद्या मीटिंगला जावे लागले तर थोडे टचअप जरुरी असते. त्यासाठी आपल्या पर्समध्ये एक मिनीमेकअप किट नक्कीच ठेवा. त्यात लिप ग्लॉस, ब्लशर, आयशेडो आणि फेस पावडर असायला हवे. शिवाय टी-स्नॅक्स किंवा लंचनंतर थोडी लिपस्टिक लावून पुन्हा फ्रेश दिसू शकता
- मेकअप रिमूव करण्याचाही वेळ नसेल तर तुम्ही त्यालाच रिफ्रेश करू शकता. यासाठी नाइट रिपेयर क्रीमचे काही थेंब हातावर घेऊन चेहऱ्यावर लावा, नंतर फेस पावडर लावा. चेहऱ्यावर डाग , खड्डे असतील त्यांनी फाउंडेशन लावण्यासाठी कन्सीलर लावावे.
- आपला पेहराव आणि वेळ याचा व्यवस्थित विचार करून मेकअप करावा. आपल्या त्वचेच्या रंगानुसार मेकअपच्या शेड्स निवडाव्यात. मेकअप करण्याआधी सर्वप्रथम चेहरा स्वच्छ घ्यावा. नंतर त्वचेनुसार टोनर, मग मॉइश्चरायझर लावा. त्यानंतर फाउंडेशनचा बेस तयार करून घ्या. यानंतर डोळ्यांचा मेकअप करावा. आधी आयशॅडो लावून मग आय-लायनर लावावं. नंतर मस्करा आणि मग ब्लशर लावावा. डोळ्यांना अनुसरून काजळ लावावं. डोळ्यांचा मेकअप झाल्यावर लिपस्टिक लावावी. लिपस्टिक लावताना आउटलाइन करून घ्यावी आणि मग त्यात लिपस्टिक लावावी. त्यानंतर लिपग्लॉस लावावा. सर्वात शेवटी कॉम्पॅक्ट किंवा ट्रान्सलुझन्ट पावडर लावावी.

# दलाई लामा



दलाई लामा म्हणजे तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते होत. चौदावे दलाई लामा तेन्झिन ग्यात्सो सध्याचे दलाई लामा आहेत. चीन ने तिबेट हा देश ताब्यात घेतांना विरोध केल्याने यांनी हिमाचल प्रदेश या राज्यात धरमशाला येथे आश्रय घेतला आहे. तिबेटमध्ये दलाई लामांची परंपरा चौदाव्या शतकापासून सुरु झाली. 'दलाई' म्हणजे ज्ञानाचा सागर व 'लामा' म्हणजे तिबेटीयन बुद्धिष्ट गुरु किंवा शिक्षक. पहिले लामा जेनडून द्रूप हे विहाराचे उच्च लामा झाले. 'ड्रेपुंग' हा तिबेटमधील सर्वात भव्य विहार आहे. पहिल्या लामांनंतर प्रत्येक नवा दलाई लामा हा पूर्वीच्या लामाचा अवतार मानला जाऊ लागला.

> सध्या दलाई लामा हे तिबेटीय लोकांचे सर्वोच्च धार्मिक नेते व शासन प्रमुख देखील आहेत. इ.स. 1391 ते इ.स. 1933 या कालखंडात तेरा दलाई लामा होऊन गेले. तिबेटीय परंपरेनुसार ज्येष्ठ धर्मगुरु व शासन मिळून नवीन दलाई लामा निवडीची जबाबदारी पार पाडतात.दलाई लामा तिबेटचे सर्वोच्च धार्मिक नेते होत. सध्याचे दलाई लामा आहेत. चौदावे दलाई लामा तेंझिन गियात्सो चीन ने तिबेट हा देश ताब्यात घेतांना विरोध केल्याने यांनी हिमाचल प्रदेश या राज्यात धरमशाला येथे आश्रय घेतला आहे. तिबेटमध्ये दलाई लामांची परंपरा चौदाव्या शतकापासून सुरु झाली. 'दलाई' म्हणजे ज्ञानाचा सागर व 'लामा' म्हणजे तिबेटीयन बुद्धिष्ट गुरु किंवा शिक्षक. पहिले लामा जेनडून द्रूप हे विहाराचे उच्च लामा झाले. 'ड्रेपुंग' हा तिबेटमधील सर्वात भव्य विहार आहे.

# गुलामगिरीची सवय नको



एका माणसाने त्याच्या घरी एक पोपट पाळला होता. पिंज-यात ठेवलेल्या पोपटाला चांगले खायलाप्यायला मिळत असे व पोपट बोलका असल्याने घरातील लोकांकडून त्याचे फार कौतुकही केले जाई. पण पोपटाच्या मनात मात्र पारतंत्र्याचे शल्य दाटून येई. अखेर एकेदिवशी पोपटाला संधी चालून आली. त्या माणसाने पोपटाला खाणे देण्यासाठी पिंज-याचे दार उघडले होते व त्याच्याहातून ते तसेच उघडे राहिले होते. माणसाला अचानक काही काम आल्याने तो ते दार उघडे टाकून निघून गेला असता पोपट पिंज-याच्या बाहेर निघून गेला. पण लहानपणापासूनच पिंज-यात राहिला असल्याने त्याला फारसे नीट उडताच येत नव्हते. एका झाडावर गेला असता त्याला इतर पोपटांशी बोलता येईना कारण लहानपणापासूनच तो परकी भाषा शिकत असल्याने त्याला पोपटांची भाषा येत नव्हती म्हणून इतर पोपटही त्याला सहकारी मानत नव्हते. पिंज-यात आयते खायची सवय असल्याने त्याला अन्न मिळवणे अवघड जाऊ लागले व ऊन वारा पाऊस यांची कधीच सवय नसल्याने तो आजारी पडला व मरून गेला.

**तात्पर्य** : जास्त काळ पारतंत्र्यात(गुलामगिरीत) राहिल्याने तशीच गुलामगिरीची सवय अंगात मुरुन राहते.

# प्राण्यांची ओळख

## पांढरा अवाक





कोंबडीपेक्षा मोठा साधारण 75 सें. मी. आकाराचा पांढरा अवाक पक्षी मुख्यत्वे काळ्या आणि पांढऱ्या रंगाचा आहे. याची चोच, डोके आणि मान तसेच पाय काळ्या रंगाचे असून उर्वरीत पक्षी पांढऱ्या रंगाचा आहे. याची चोच लांब आणि बाकदार असते. वीण काळात नराच्या पाठीकडील भाग आणि पंख काळपट करड्या रंगाचे होतात. एरवी नर-मादी दिसायला सारखेच असतात. हे पक्षी पाणथळ भागात थव्याने राहतात.भारतासह नेपाळ, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, म्यानमार, जपान पर्यंत दक्षिण आशियाई देशात पांढरा अवाक पक्ष्याचे वास्तव्य आहे. हे भारतात निवासी आणि स्थानिक स्थलांतर करणारे आहेत. दलदलीचे प्रदेश, सरोवरांच्या भागात आढळणारा हा पक्षी काळा अवाक तसेच बगळ्यांसह राहतो. सकाळ-संध्याकाळ एखाद्या झाडावर सर्व एकत्र जमतात. अशा जागेला सारंगागार म्हणतात.उथळ पाण्यात चोच बुडवून एकट्याने आणि लहान-मोठ्या थव्याने हे पक्षी दिवसभर खाद्य शोधत फिरतात. सरडे, गोगलगाय, बेडुक, मासोळ्या, खेकडे वगैरे पाण्यात राहणारे जीव पांढरा अवाक पक्ष्यांचे खाद्य आहे.

## कविता

# ताई रडू नको !

ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते
तुझे आसू माझ्या गाली,
ओघळती वाटते!
नीज माझ्या मांडीवरी
गातो तुला मी अंगाई
डहाळीची दोन फुले
माझी तुझी एक आई
मीट पाहू डोळे ओले
कापरे की ओठ ते
ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते
किती किती
दिवसांनी तुझी माझी
झाली भेट
जन्म झाल्यापासूनिया
पहातो मी गे तुझी वाट
पुन्हा पुन्हा का ग डोळा
पाणी तुझ्या साठते
ताई रडू नको बाई,
रडू मला दाटते !
देतो तुला माझा खेळ
ताई नको गं रागाऊ
चिमणीच्या दातांनी
माझ्यातला देतो खाऊ
पापे देतो गालाचे मी

# छोट्यांच्या पाककृती

तुम्हाला सारखी भूक लागलेली असते. ती सुध्दा तुमच्या आवडीच्या पदार्थांची. पण पदार्थांची. पण आई मात्र तुमच्या मनासारखे काही करू देत नाही. खरे आहे ना? मग आपण एक गंमत करू या. तुम्हीच स्वयंपाक घरात शिरून फारशी धडपड न करता काही पदार्थ स्वतःचे स्वतः बनवू शकालात तर? काय म्टलात, जमणार नाही? छे छे अगदी सोपे पदार्थ तुम्हाला बनविता येतील त्यासाठी ते कसे बनवायचे याची साधी सोपी रीत पुढे दिलेली आहे.यात एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायची गॅस, मिक्सर काही वापरायचे नाही. सुरी, हात न कापता वापरता येत असेल तर ती वापरायची. थोडीशी पूर्वतयारी आई, ताई किंवा स्वयंपाकाच्या काकूंकडून करून घ्यायची. आणि बाकीचे आपण आपले करून घ्यायचे. चला मग. आपण स्वयंपाक घराकडे आपला मोर्चा वळवू या काहीतरी नवीन करण्यासाठी - आणि आवडीचे पदार्थ खाण्यासाठी !'



## टॉमेटो जिंजर सूप

### साहित्य

६ मोठे टॉमेटो १ टिस्पून आले, किसलेले १/४ टिस्पून लाल तिखट १/२ टिस्पून सोया सॉस १ टेस्पून पाइनॅपल क्रश चवीपुरते मिठ चवीपुरती साखर १/२ चमचा लिंबू रस

### कृती

टॉमेटो उकडून घ्यावे. उकडलेले टॉमेटो, साधारण दीड कप पाणी, आले, लाल तिखट, अननस, मिठ, साखर आणि लिंबू रस एकत्र मिक्सरमध्ये बारीक वाटावे. गाळण्यातून गाळून घ्यावे. पातेल्यात घालून एक उकळी काढावी. चव पाहून गरजेचे जिन्नस घालावे. सोया सॉस घालून सूप सर्व्ह करावे.

# दिलेल्या चित्रात रंग भरा





दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, गुरुवार 01 ऑक्टोबर 2026
Last page

# प्रभाग ७ मध्ये सौ.पूजा सारडा-सौ.अश्विनी केंद्रे यांच्या पुढाकारातून महालक्ष्मी सजावट स्पर्धा रंगली ; स्पर्धेचे विजेते जाहीर



## महालक्ष्मी सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. अश्विनीताई अरबूने; सौ.पूजा सारडा- सौ.अश्विनी केंद्रे यांच्या उपक्रमाला महिलांचा भरघोस प्रतिसाद

## प्रभाग क्र. ७ मधील ९३ महिलांचा उत्स्फूर्त सहभाग; सौ. वैशालीताई आरगडे द्वितीय, सौ. वर्षाताई पुरी तृतीय तर उत्तेजनार्थ तीन पारितोषिके जाहीर



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-**

सौ. पूजा सचिन सारडा आणि नगरसेविका सौ. अश्विनी राहुल केंद्रे यांच्या पुढाकारातून प्रभाग क्र. ७ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'महालक्ष्मी सजावट स्पर्धा २०२६'चा निकाल जाहीर झाला असून, सौ. अश्विनी अरबूने यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय क्रमांक सौ. वैशाली आरगडे, तर तृतीय क्रमांक सौ. वर्षाताई पुरी यांनी मिळविला आहे. स्पर्धेत प्रभागातील तब्बल ९३ महिलांनी सहभाग नोंदविला होता.

महालक्ष्मी उत्सवानिमित्त प्रभाग क्र. ७ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'महालक्ष्मी सजावट स्पर्धा २०२६'चा निकाल जाहीर करण्यात आला असून, सौ. अश्विनी अरबूने यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय क्रमांक सौ. वैशाली आरगडे, तर तृतीय क्रमांक सौ. वर्षाताई पुरी यांनी मिळविला आहे. आ. धनंजयजी मुंडे साहेब व मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सौ. पूजा सचिन सारडा आणि नगरसेविका सौ. अश्विनी राहुल केंद्रे यांच्या पुढाकारातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, तब्बल ९३ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचे परीक्षण तज्ज्ञ महिला परीक्षकांच्या टीमकडून घरोघरी जाऊन करण्यात आले. महालक्ष्मीच्या देखाव्याची संकल्पना, सजावटीतील कलात्मकता, कल्पकता, सादरीकरण आणि एकूण मांडणी या बाबींच्या आधारे परीक्षण करण्यात आले. उत्तेजनार्थ पारितोषिकासाठी सौ. गायत्रीताई पेंटेवार, सौ. जयश्रीताई गायकवाड आणि सौ. विजयाताई सोमाणी यांची निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली होती. प्रथम क्रमांकासाठी मायक्रोवेव्ह ओव्हन, द्वितीय क्रमांकासाठी एअर फ्रायर, तृतीय क्रमांकासाठी झेट्रॉनिक्स साउंडबार, तर उत्तेजनार्थ विजेत्यांसाठी हँड ब्लेंडर देण्यात येणार आहे. प्रभागातील महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे आणि महालक्ष्मी उत्सव अधिक उत्साहपूर्ण वातावरणात साजरा व्हावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आले होते. निकाल जाहीर झाल्याने सहभागी महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. सौ. पूजा सचिन सारडा आणि नगरसेविका सौ. अश्विनी राहुल केंद्रे यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे प्रभागातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या आष्टीतील 'पेठ' व 'कसबा' गणेश मंडळांचा मनसे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांच्या हस्ते गौरव!

## दहा दिवस विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**आष्टी प्रतिनिधी :**

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता तो सामाजिक एकोपा, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उत्सव व्हावा, या उद्देशाने आष्टी शहरातील पेठ गणेश मंडळ आणि कसबा गणेश मंडळाने गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नेटके आयोजन केले होते. या सर्व उपक्रमांचे कौतुक करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी दोन्ही गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांचा विशेष गौरव केला.

या दोन्ही मंडळांनी आयोजित केलेल्या विविध समाजोपयोगी कार्यक्रमांमुळे गणेशभक्तांना उत्सवाचा खरा आनंद घेता आला. या माध्यमातून शहरातील नागरिक, तरुण व गणेशभक्तांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. दोन्ही मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी घेतलेल्या अफाट मेहनतीचे कैलास दरेकर यांनी जाहीर कौतुक केले. यावेळी बोलताना दरेकर यांनी,



"गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा आणि एकोप्याची भावना समाजात अधिक मजबूत होण्याची गरज आहे," अशी भावना व्यक्त केली.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप, कसबा गणेश मंडळाचे अध्यक्ष विकास धुमाळ, उपाध्यक्ष शेखर मुथ्था, चेतन मेहर, गोपाल वर्मा, तसेच पेठ गणेश मंडळाचे अध्यक्ष व नगरसेवक किशोर झरेकर, कुलवडे, मधुरकर, विकास उरणे, अतुल करडुळे या दोन्ही मंडळांचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंडळांनी राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमांचे आणि मनसे जिल्हाध्यक्षांनी केलेल्या या गौरवाचे आष्टी शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# शेळगाव मंडळातील विविध गावांमध्ये नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू



**सोनपेठ** | तालुक्यात यंदा पावसाने मोठी ओढ दिल्याने गंभीर दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सोनपेठचे तहसीलदार सुनील कावरखे यांच्या आदेशानुसार महसूल यंत्रणा पूर्णपणे गतिमान झाली असून शेळगाव मंडळातील विविध गावांमध्ये मंडळ अधिकारी ज्योती प्रधान व संबंधित तलाठी शुभांगी आळे, कृषी सहाय्यक अतुल राऊत यांच्या पथकाकडून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पीक नुकसानीचे पंचनामे प्रत्यक्ष सुरू करण्यात आले आहेत.

सन २०२६ च्या खरीप हंगामात दुष्काळाची प्रथम कळ लागलेल्या सोनपेठ तालुक्यामध्ये महसूल प्रशासनाने अत्यंत तत्परतेने ही कार्यवाही हाती घेतली आहे. या संयुक्त पाहणी दरम्यान प्रशासनाकडून पिकांच्या सद्यस्थितीची अत्यंत बारीक-सारीक आणि वस्तुनिष्ठ निरीक्षणे नोंदविली जात आहेत. नुकसान भरपाईच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता राहावी यासाठी तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांचे विशेष संयुक्त पथक नेमण्यात आले आहे. हे पथक प्रत्येक गावात जाऊन प्रत्यक्ष शेतात पिकांची पाहणी करत आहेत.

शेतीच्या नुकसानीचे शेतकरीनिहाय पंचनामे केले जात असून यामध्ये शेतकऱ्याचे नाव व एकूण क्षेत्र, फार्मर आयडी, बाधित पिकाचे नाव व नुकसानीची टक्केवारी, बँक खाते तपशील आदी माहिती गोळा करून त्यावर शेतकऱ्यांची प्रत्यक्ष स्वाक्षरी घेतली जात आहे.

# भारताचा ऐतिहासिक विजय, वेस्ट इंडिजविरुद्ध 406 धावांचं विजयी लक्ष्य गाठलं

भारताने दुसऱ्या वनडे सामन्यात ऐतिहासिक विजय मिळवला. वेस्ट इंडिजने विजयासाठी 406 धावांच आव्हान ठेवलं होतं. हे लक्ष्य तसं कठीण होतं. पण कर्णधार शुभमन गिल आणि रोहित शर्माच्या झंझावाती खेळीमुळे हा विजय सोपा झाला. दुसऱ्या वनडे सामन्यात भारताने नाणेफेकीचा कौल जिंकला आणि प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण वेस्ट इंडिजने 50 षटकात 7 गडी गमवून 405 धावा केल्या आणि विजयासाठी 406 धावांचं आव्हान ठेवलं. खरं तर हे खूपच कठीण आव्हान होतं. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाची कामगिरी कशी असेल? याबाबत क्रीडाप्रेमींमध्ये संभ्रम होता. मात्र कर्णधार शुभमन गिल आणि रोहित शर्मा यांनी वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडलं. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी विक्रमी 255 धावांची भागीदारी केली. 158 चेंडूत 255 धावा केल्याने वेस्ट इंडिजचा संघ बॅकफूटवर गेला.

हित शर्मा बाद झाल्यानंतरही शुभमन गिलने किल्ला लढवणं सुरूच ठेवलं. त्याला विराट कोहली साथ मिळाली. शुभमन गिलने या दरम्यान दीड शतकी खेळी आणि द्विशतकाच्या दिशेने कूच केली. शुभमन गिलच्या प्रत्येक फटक्यावर वेस्ट इंडिजच्या हातून विजय निसटत गेला. वनडे क्रिकेटच्या इतिहासात भारतीय संघाने पहिल्यांदाच 400 पेक्षा अधिक धावांच्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग केला आहे. यापूर्वी भारताचा सर्वात मोठा यशस्वी पाठलाग 2013 मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध होता. तेव्हा भारताने 360 धावांचे लक्ष्य गाठले होते.

भारतामध्ये कोणत्याही संघाविरुद्ध एकदिवसीय सामन्यात गाठलेले हे सर्वात मोठे विजयी लक्ष्य ठरले आहे. यापूर्वी जयपूर 2013 मध्ये भारताने आणि रायपूरमध्ये 2025 मध्ये दक्षिण आफ्रिकेने 360 धावांचे लक्ष्य यशस्वीरीत्या गाठले होते. जागतिक पातळीवर एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासातील हा दुसरा सर्वात मोठा यशस्वी चेझ ठरला आहे. 2006 मध्ये दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाविरुद्ध 435 धावांचे लक्ष्य गाठून अव्वल स्थान मिळवले होते. त्यानंतर आता भारताने 400 हून अधिक धावा करून इतिहास रचला आहे.

### ■ एकाच सामन्यात ५ शतकांचा विक्रम

या सामन्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही संघांच्या मिळून तब्बल 5 फलंदाजांनी शतके झळकावली. वेस्ट इंडिजकडून जॉन कॅम्पबेल (101), शाय होप (104) आणि अमीर जांगू (114) यांनी शतके झळकावली, तर भारताकडून रोहित शर्मा (101) आणि शुभमन गिल (द्विशतक) यांनी शतके केली.

### ■ गिलची विक्रमी खेळी

भारताच्या विजयाचा शिल्पकार ठरला शुभमन गिल. गिलने शानदार द्विशतकी खेळी करत 223 धावा फटकावल्या. त्याला रोहित शर्माची दमदार साथ मिळाली. भारताने अवघ्या 43.3 षटकांत 406 धावांचे लक्ष्य गाठत सामना आपल्या नावावर केला.

### ■ मालिकेत भारताची आघाडी

या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. वेस्ट इंडिजने उभारलेल्या 405 धावांच्या मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग करत भारताने आपली फलंदाजीची ताकद पुन्हा एकदा दाखवून दिली.

